महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दूरध्वनी क्र . २६३८ ३००९/२६३८ ३०१६
Email ID: ddadm.des@gmail.com

क्रमांक : पदोन्नती/२०२३-२४/गट-ब (अराज)/ प्र.क्र. २८१/प्रशा-२/ १६८२ दिनांक : २९।१२।२०२३

वाचा :

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि. ०१/०८/२०१९
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि. १४/०७/२०२१.

## कार्यालयीन आदेश

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सांख्यिकी सहायक, गट क संवर्गातील खालील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांना पुढील आदेशापर्यंत सहायक संशोधन अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील (सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर : S_१४ (३८६०० – १२२८००) या पदावर खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून या आदेशान्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नतीनंतरची त्यांची प्रशासकीय कारणास्तव पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ६ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सांख्यिकी सहायकांचे नाव व सध्या कार्यरत असलेले कार्यालय | कर्मचा-यांचा स्वत:चा प्रवर्ग | कर्मचा-यांनी दिलेला पसंतीचा विभागीय संवर्ग | महसुल विभाग वाटप नियम - २०२१ नुसार वाटप केलेला विभागीय संवर्ग | पदोन्नतीनंतर सहायक संशोधन अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) पदावर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. दाऊद अब्बास शेख, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सिंधुदुर्ग. | खुला | कोकण १ | कोकण १ | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग |
| २ | श्रीमती शिल्पा मच्छिंद्र इंगळे, (श्रीमती शि.सु.नागवेकर) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | खुला | कोकण २ | कोकण २ | नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांचे कार्यालय, मुंबई. |
| ३ | श्रीमती रुपाली प्रकाश पाटील, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई | खुला | कोकण २ | कोकण २ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई |

| अ. क्र. | सांख्यिकी सहायकांचे नाव व सध्या कार्यरत असलेले कार्यालय | कर्मचा-यांचा स्वत:चा प्रवर्ग | कर्मचा-यांनी दिलेला पसंतीचा विभागीय संवर्ग | महसुल विभाग वाटप नियम - २०२१ नुसार वाटप केलेला विभागीय संवर्ग | पदोन्नतीनंतर सहायक संशोधन अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) पदावर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४ | श्री. राजेंद्र दत्तात्रय काटकर, जलसंपदा पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई. | इमाव | कोकण २ | कोकण २ | जलसंपदा पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ५ | श्रीमती जयश्री सचिन बाकरे, जिल्हा मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक | इमाव | नाशिक | नाशिक | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे |
| ६ | श्रीमती लीना संतोष लाड, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई | इमाव | कोकण २ | कोकण २ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई |
| ७ | श्री. श्रीकांत राजाराम पाटील, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, सांगली. | खुला | पुणे | पुणे | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली |
| ८ | श्रीमती तृप्ती गिरीष पाटील, राज्य कृषीमुल्य आयोग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई | अज | कोकण २ | कोकण २ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई |
| ९ | श्री. दत्तात्रय भास्कर मुतडक, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक | भज ड | नाशिक | नाशिक | जिल्हा सांख्यिकी कार्यालय, नंदूरबार |
| १० | श्री. महेश्वर एकनाथ चौधरी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर | इमाव | नागपूर | नागपूर | जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण कार्यालय, चंद्रपूर. |
| ११ | श्री. निलेश वासुदेव राहांगडाले, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, नागपूर | इमाव | नागपूर | नागपूर | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली |
| १२ | श्री. स्वप्नील वसंत वनकावार, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, भंडारा | विमाप्र | नागपूर | नागपूर | जिल्हा सांख्यिकी कार्यालय, गडचिरोली. |
| १३ | श्रीमती अपर्णा अशोक भालेराव, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, मुलुंड - मुंबई उपनगर | खुला | कोकण २ | कोकण २ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई |
| १४ | श्रीमती शितल शामराव पवार, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोकण | खुला | कोकण २ | कोकण २ | विशेष राज्य कर आयुक्त, राज्य कर आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई |
| १५ | श्रीमती ज्योती राजेंद्र टिळे, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई. | खुला | कोकण २ | कोकण २ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई |

| अ. क्र. | सांख्यिकी सहायकांचे नाव व सध्या कार्यरत असलेले कार्यालय | कर्मचा-यांचा स्वत:चा प्रवर्ग | कर्मचा-यांनी दिलेला पसंतीचा विभागीय संवर्ग | महसुल विभाग वाटप नियम - २०२१ नुसार वाटप केलेला विभागीय संवर्ग | पदोन्नतीनंतर सहायक संशोधन अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) पदावर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १६ | श्रीमती सुरेखा भागाजी सोनवणे, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, पुणे | खुला | पुणे | औरंगाबाद | मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद |
| १७ | श्रीमती सरिता मंगेश कुंभरे, उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक | खुला | औरंगाबाद | औरंगाबाद | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद |
| १८ | श्रीमती समृध्दी वैभव कदम. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई | इमाव | कोकण २ | कोकण २ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई |
| १९ | श्री.अमोलकुमार रामचंद्र तोंडे, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम | खुला | अमरावती | औरंगाबाद | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना |
| २० | श्रीमती दिपमाला नंदलाल चौधरी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती | भज क | नागपूर | औरंगाबाद | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना |

२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी याचिका क्र. १४५३/२०२३ मध्ये दिनांक २२/१२/२०२३ रोजी दिलेल्या आदेशान्वये, सदर पदोन्नत्या या सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्याबाबतचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०७/०५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन असतील.

४. सन २०२३-२०२४ या निवडसूची वर्षाकरीता पात्र सांख्यिकी सहायक यांची निवडसूची तात्पुरत्या स्वरुपाची असून सहायक संशोधन अधिकारी पदावरील पदोन्नत्या ह्या तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत.

५. या आदेशान्वये पदोन्नत होणाऱ्या कर्मचा-यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. सदर कर्मचा-यांच्या सेवा जेष्ठतेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

६. संबंधित कर्मचा-यांना पदोन्नती स्विकारावयाची नसल्यास एक महिन्याच्या आत त्याबाबत लेखी स्वरुपात संचालनालयास कळवावे.

७. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये 'वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर अथवा तत्पूर्वीच एखाद्या कर्मचा-याने पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शविल्यास, त्याचे नांव पदोन्नतीसाठी पात्र असणा-या अधिकारी / कर्मचा-यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणा-या निवडसूच्यांमध्ये संबंधित अधिकारी / कर्मचा-यांच्या नावाचा विचार न करता तिस-या वर्षाच्या निवडसूचीत संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्याची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळच्या गुणवत्तेप्रमाणे संबंधित अधिकारी / कर्मचा-याची पदोन्नतीसाठी पात्र ठरल्यास त्याचा नियमित निवडसूचीत समावेश करण्यात येईल.'

८. पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्यानंतर पदोन्नती नाकारता येणार नाही.

९. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सीबीसी-१०/२००४/प्र. क्र.५७०/ मावक-५,दिनांक १६/५/२००७ तसेच आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दिनांक १३/४/२००० व दिनांक २८/५/२००१ मधील तरतुदींनुसार मागासवर्गीयांचे जात प्रमाणपत्र वैध असल्याशिवाय पदोन्नती देता येत नाही. परिणामत: निवड सूचीमधील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी ज्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे अशाच कर्मचाऱ्यांना या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत आहे. उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता यथावकाश निश्चित करण्यात येतील.

१०. या पदोन्नती आदेशातील ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगती/सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा फायदा मिळालेला नाही त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ नुसार पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चिती करण्यात यावी.

११. या पदोन्नती आदेशातील जे कर्मचारी आदेश प्राप्त झाल्यानंतर विहित कालावधीत पदोन्नती स्विकारणार नाहीत किंवा विविध सबबी खाली पदस्थापना स्विकारण्यास टाळाटाळ करतील त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/ सेवा-३, दिनांक ०२/०३/२०१९ नुसार सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवातंर्गत प्रगती योजनेखाली मंजूर केलेले लाभ काढून घेण्यात येतील. तथा अशा लाभांची वसुली करता येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणुकाही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.

१२. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दिनांक १४/०७/२०२१ अन्वये जर संबंधित कर्मचारी "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०२१" नुसार वाटप झालेल्या संबंधित महसुल विभागात ३० दिवसांच्या आत रुजू झाला नाही तर संबंधित अधिका-याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

१३. संबंधित कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यास विहित मुदतीत कार्यमुक्त न केल्यास संबंधित कर्मचा-याच्या सेवाजेष्ठता व इतर सेवाविषयक बाबी संदर्भात पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कार्यालय प्रमुखाची जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

१४.	संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांनी या आदेशात अंतर्भूत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या पदावर रूजू होण्यासाठी स्थानिकरित्या व्यवस्था करून तात्काळ कार्यमुक्त करावे व कर्मचा-यांचा कार्यमुक्ततेचे/ रूजू झाल्याचे आदेश संचालनालयास त्वरीत पाठवावेत.

(डॉ. जि. व. चौधरी)
संचालक
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री/श्रीमती ------------------------------------------------------------------------------------------

प्रत : माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी
१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३. सह सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सह सचिव, जलसंपदा पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सह सचिव, राज्य कृषीमुल्य आयोग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अवर सचिव, नियोजन विभाग (का.१४२६), मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त, मृद व जलसंधारण आयुक्तालय औरंगाबाद
८. विशेष राज्य कर आयुक्त, राज्य कर आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
९. नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांचे कार्यालय, मुंबई.
१०. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, सांगली / मुलुंड, मुंबई उपनगर/चंद्रपूर
११. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
१२. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय सर्व.
१३. उप संचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सिंधुदुर्ग/ नागपूर/ भंडारा/ नंदूरबार/गडचिरोली
१४. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक/ चंद्रपूर/वाशिम/अमरावती/ सिंधुदुर्ग/ धुळे/सांगली/ गडचिरोली/ जालना
१५. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
१६. अपर कोषागार अधिकारी, कोकण, नवी मुंबई.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, सिंधुदुर्ग/ नाशिक/ धुळे /सांगली/ नंदूरबार /चंद्रपूर/ नागपूर/ गडचिरोली /भंडारा/ पुणे/ औरंगाबाद/ वाशिम/ जालना/ अमरावती.

संबंधित कर्मचा-याचे नियुक्तीच्या पदावरील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख संबंधित कर्मचा-यांच्या सध्याच्या पदावरील व नियुक्तीच्या पदावरील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यांत येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahades.maharashra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्याने सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त कर्मचा-यांना कार्यमुक्त करणे अथवा हजर करुन घेण्याबाबत संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

प्रत :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपर संचालक (सर्व) | [] | |
| २. | सह संचालक (सर्व) | [] | |
| ३. | प्रशासन शाखा-१/२/३/४ | [] | |
| ४. | ज्येष्ठतासूची कार्यासन (प्रशा-२) | [] | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, |
| ५. | मुख्य संगणक नोंदवही (प्रशा-२) | [] | मुख्य कार्यालय, मुंबई. |
| ६. | सेवापुस्तक कार्यासन (प्रशा-४) | [] | |
| ७. | निवडनस्ती | [] | |